<u>सं.फौ.ख.क्र. ५८१/२०२२</u>

<u>MHRG080011932022</u>

<u>(निशाणी क्र.   क/लगत)</u>

<u>सरकार वि. नारायण घनश्याम पाटील</u>

<u>पी.एम.माने, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खालापूर यांचे न्यायालयात</u>

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ५८१/२०२२**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | - | २७/०८/२०२२. |
| २. | फिर्याद दाखल तारीख | - | २९/०८/२०२२. |
| ३. | फिर्यादीचे नांव | - | **महाराष्ट्र शासन तर्फे,**<br>खोपोली पोलीस स्टेशन,<br>ता. खालापूर, जि.रायगड. |
| ४. | आरोपीचे नांव | - | **श्री. नारायण घनश्याम पाटील,**<br>व.व. ५८, व्यवसाय-चालक,<br>रा. मोगलवाडी स्नेहश्री बिल्डींग, खोपोली,<br>ता. खालापुर, जि. रायगड |

५. गुन्हयाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

दिनांक २७/०८/२०२२ रोजी १८.०५ वाजताचे सुमारास खोपोली बाजारपेठेत, कुणाल मोबाईल शॉपीसमोरील सार्वजनिक रोडवर तुमच्या ताब्यातील प्रवासी रिक्षा क्र. एम.एच. ४६ सी. ०४६३ हे वाहन रहदारीस अडथळा होईल असे सार्वजनिक रोडवर लावलेल्या स्थितीत मिळून आलात आणि त्यायोगे तुम्ही भारतीय दंड विधान संहिता कलम २८३ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केलेला असून मी गुन्हयाची दखल घेतली आहे.

आणि मी याद्वारे असे निर्देश देतो की, तुमची उपरोक्त आरोपाकरीता हया न्यायालयाद्वारे न्याय चौकशी करणेत यावी.

सही/-

**(पी.एम.माने)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२,खालापूर.

दिनांक २९/०८/२०२२
खालापूर.

**सं.फौ.ख.क्र. ५८१/२०२२**

**MHRG080011932022** (निशाणी क्र. क/लगत)

गुन्हयाचा तपशिल आरोपीला त्याचे मातृभाषेत वाचून दाखविणेत आला व समजावून सांगणेत आला. आरोपीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे.

सही/-
**(पी.एम.माने)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२,खालापूर.

दिनांक २९/०८/२०२२
खालापूर.

## आरोपीचे निवेदन

प्र. १ ला. - पोलीसांनी दाखल केलेल्या खटल्याचे कागदपत्र तुम्हाला मिळाले काय?
उत्तरः - होय.

प्र. २ रा. - गुन्हयाचा तपशील आता वाचून दाखविला व समजावून सांगितला, तो तुम्हाला समजला काय ?
उत्तरः - होय.

प्र. ३रा. - तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तरः - होय. मला गुन्हा कबुल आहे.

सही/-
**(पी.एम.माने)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, खालापूर.

दिनांक २९/०८/२०२२
खालापूर

सही/-
......................................

आरोपीची सही/अंगठा

**<u>सं.फौ.ख.क्र. ५८१/२०२२</u>**

**MHRG080011932022** (निशाणी क्र.   क/लगत)

## कारणे

आरोपीने वरील गुन्हा कबुल केला आहे. आरोपीकडे मी प्रत्यक्ष विचारणा केली. त्याने कोणत्याही दबावास अथवा मोहास बळी न पडता गुन्हा कबुल केल्याची माझी खात्री पटली. त्यामुळे आरोपीला वरील गुन्हयासाठी दोषी धरणेत येत आहे. मी शिक्षेच्या मुद्दयावर आरोपीचे म्हणणे ऐकले. त्याने असे सांगितले की, त्याचेवर त्याचे कुटुंबाचे पालन पोषणाची जबाबदारी आहे, त्यामुळे त्याने कमीत कमी शिक्षा करणेची विनंती केली. वरील परिस्थिती व गुन्हयाचे स्वरुप विचारात घेता आरोपीला सौम्य स्वरुपाची शिक्षा करणे न्यायाचित ठरेल, असे मला वाटते. त्यामुळे, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो:-

## -:आदेश:-

| | |
|---|---|
| ०१. | आरोपी नामे **नारायण घनश्याम पाटील** यास भारतीय दंड विधान संहिता कलम २८३ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाकरिता फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २५२ प्रमाणे दोषी धरणेत येत आहे. |
| ०२. | आरोपीने रक्कम रु. २००/- (रुपये दोनशे मात्र) दंड म्हणून भरावेत. दंड न भरल्यास आरोपीने ३ दिवस साध्या कारावासाची शिक्षा भोगावी. |
| ०३. | या आदेशाची प्रत आरोपीला विनामुल्य देणेत यावी. |

**(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRADIP MADAN MANE
Date: 2022.08.30 12:59:00 +0530

दिनांक २९/०८/२०२२
खालापूर

**(पी.एम.माने)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, खालापूर